## पालकमंत्री नितेश राणेंच्या उपस्थितीत प्रवेश

# उपजिल्हा रुग्णालय कृती समितीचे अध्यक्ष भाजपात

**उपजिल्हा रुग्णालय कृती समितीचे अध्यक्ष नरसू रेडकर यांनी भारतीय जनता पार्टीचा झेंडा हाती घेतला आहे. आरोग्यप्रश्नी लढा देणाऱ्या या संघटनेच्या अध्यक्षांनी पालकमंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला आहे. मंत्री श्री. राणेंच्या माध्यमातून आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी हा प्रवेश केल्याचे सांगितले.**

**कोकणसाद वृत्तसेवा**



**सावंतवाडी :** सावंतवाडी येथील उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयात 'भू प्रणाम केंद्रा'चे उद्घाटन राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. नितेश राणे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी हा पक्षप्रवेश पार पडला. यामध्ये उपजिल्हा रुग्णालय कृती समितीचे अध्यक्ष एन.बी. रेडकर यांनी जाहीर प्रवेश केला. तर सातत्याने आरोग्यप्रश्न मांडणारे सामाजिक कार्यकर्ते ॲड. तेजस परब यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. ॲड. परब यांच्या नेतृत्वाखाली कुणाल खोत, नंदकिशोर गावडे, नारायण आकेरकर, अनंत कोदे, दीपक लाखे, क्रिस्टोफर अल्मेडा, व्हिन्सेंट अल्मेडा, झकेरीस अल्मेडा, अनिकेत मळगावकर, गोविंद मळगावकर, रूपेश चिंदरकर, रॉकसन डान्टास, अक्षय तळवडेकर, पार्थ तळवडेकर, प्रतीक भागवत, अनिल ठाकूर, सिद्धार्थ निंबाळकर, ओमकार चव्हाण, ईशान डोंगरे, अनिकेत चराठकर, रजत एकणेकर, आर्यन आमुणेकर, महादेव हवालदार, संजू येडगे, गंगाराम येडगे, मंगेश सावंत, हर्षद कालेलकर, रोहित पोकळे, शाहिद शेख, गणराज नरसू रेडकर, सुनील तुळसकर, एन. बी. रेडकर, नेहा तुळसकर, सिद्धेश परब, अजित राऊळ, रॉयस्टन डीसुझा, ओमकार शिरसाट, अमेय गिरप, अंकित गिरप, अझीम शेख, केतन पार्सेकर, प्रज्वल सावंत, दुर्गेश सावंत, शिवांग धारगळकर, ओमकार आईर आदींनी भाजपचा झेंडा हाती घेतला. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, सावंतवाडीच्या नगराध्यक्षा श्रद्धाराजे भोंसले आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ॲड. तेजस परब म्हणाले, गेली काही वर्षे सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील आरोग्य व रोजगार संदर्भातील प्रश्न सोडविणे हाच आमचा मुख्य हेतू होता. पालकमंत्री नितेश राणे यांच्या सोबत अलिकडेच झालेल्या काही बैठकांमध्ये त्यांचे याबाबतीतील सकारात्मक विचारांमुळे प्रभावीत होऊन भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. यापुढे पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे व आरोग्य व्यवस्था सुधारणे हा आमचा मुख्य हेतू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर भाजपची विचारसरणी नरेंद्र मोदींचे व्हीजन यामुळे प्रभावित झालेल्या अन्य सहकाऱ्यांनी देखील माझ्यासोबत भाजपात प्रवेश केला आहे.

## सिंधुदुर्गातील उबाठा शिवसेनेचे डीजी कक्ष पदाधिकारी जाहीर

**कणकवली :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या डीजी कक्ष (सोशल मिडीया) नूतन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे शिवसेना सिंधुदुर्ग जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार वैभव नाईक यांनी अभिनंदन केले आहे. पदाधिकारी पुढीलप्रमाणे : अमर घाडी - सिंधुदुर्ग जिल्हा समन्वयक, प्रसाद रेवडेकर - कुडाळ विधानसभा समन्वयक, विठोबा गुरव - कणकवली विधानसभा समन्वयक, विनय कदम - कुडाळ तालुका समन्वयक, प्रसाद गावडे - कुडाळ तालुका सहसमन्वयक, तपस्वी मयेकर - मालवण तालुका समन्वयक, श्रीधर सावंत - कणकवली तालुका समन्वयक, लोकेश माणगावकर - देवगड तालुका समन्वयक, गुलझार काझी - वैभववाडी तालुका समन्वयक, ओंकार पंडित - वेंगुर्ले तालुका समन्वयक, सिद्धेश कासार - दोडामार्ग तालुका समन्वयक.

# तडीपार व्यक्तीला गोमांस वाहतूक करताना अटक

- **१ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**कोकणसाद वृत्तसेवा**



**सावंतवाडी :** दोन वर्षांसाठी तीन जिल्ह्यांतून हद्दपार केलेल्या सावंतवाडीतील एकाने आदेशाचे उल्लंघन करत बेकायदेशीरपणे गोमांसाची वाहतूक केल्याचा धक्कादायक प्रकार सावंतवाडीत उघडकीस आला आहे. सावंतवाडी पोलिसांनी छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून गोमांस सदृश्य मांस, दुचाकी आणि हत्यार असा सुमारे १ लाख १७ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बजरंग दल सावंतवाडीच्या कार्यकर्त्यांनी याबाबतची माहिती पोलीसांना दिली होती. त्यानंतर ही धडक कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगेश लक्ष्मण शिंगाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तडीपार मोहम्मद सरफराज बहुउद्दिन ख्वाजा (वय ४५, रा. घर क्र. १४५, बाहेरचावाडा, सावंतवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी सायंकाळी ५.४० वाजण्याच्या सुमारास बाहेरचावाडा, सावंतवाडी येथील राहत्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर आरोपी ख्वाजा हा आपल्या ज्युपिटर मोटरसायकलवरून (क्र. MH-07-AV-9779) संशयास्पदरित्या जात असताना पोलिसांनी त्याला रोखले. दुचाकीच्या डिकीची झडती घेतली असता, त्यात २४ काळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरलेले २४.८०० किलोग्रॅम वजनाचे गोमांस सदृश्य मांस आढळून आले. आरोपी मोहम्मद सरफराज ख्वाजा याला उपविभागीय दंडाधिकारी सावंतवाडी यांच्या आदेशान्वये सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि रत्नागिरी या तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले होते. हद्दपारीचा आदेश २७/०६/२०२६ रोजी बजावण्यात आला होता व आरोपीने आपण गोव्यात राहणार असल्याचे लेखी दिले होते.

मात्र, या आदेशाचे उल्लंघन करत तो गोमांसाची विक्री व वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले. बजरंग दल सावंतवाडीच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी पोलिसांना कल्पना दिली. त्यानंतर पोलिसांनी धडक कारवाई करत त्याच्या मुसक्या आवळल्या. आरोपी सरफराज ख्वाजा हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर सावंतवाडी पोलीस ठाण्यात यापूर्वी मारहाण, विनयभंग, बाल न्याय कायद्यांतर्गत गुन्हे तसेच गोवंश संरक्षण कायद्यान्वये ६ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी सावंतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले असून तपासासाठी घटनास्थळाला परि. डी.वाय.एस.पी. दीपक शेलार, पोलीस निरीक्षक राजेंद्र मगदूम व सहाय्यक पोलीस निरीक्षक हिंगे यांनी भेट दिली. पोलीस अंमलदार श्री. परब यांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सपोनि. श्री. हिंगे करत आहेत. आरोपीस अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



## मदर क्वीन्स इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडीचा जल्लोष

**सावंतवाडी :** सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मदर क्वीन्स इंग्लिश स्कूल, सावंतवाडी येथे शुक्रवार ४ सप्टेंबर २०२६ रोजी दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. नर्सरी, ज्युनिअर केजी व सिनिअर केजीतील चिमुकले विद्यार्थी बाळकृष्ण व राधेच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. त्यांच्या निरागस रूपाने आणि उत्साहाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. मंडळाच्या विश्वस्त व विद्यमान नगराध्यक्षा युवराज्ञी श्रद्धाराजे लखमसावंत भोंसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशालेच्या आवारात आकर्षक पद्धतीने सजवलेली दहीहंडी फोडून चिमुकल्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी बहुसंख्य पालकवर्गानेही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या निमित्ताने पारंपरिक वेशभूषा, आनंदी वातावरण आणि चिमुकल्यांचा उत्साह यामुळे प्रशालेत उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीम. सिंड्रेला परेरा, श्रीम. सेलिन बर्नार्ड, श्रीम. अनघा आयरे व श्रीम. सिद्रा शेख या शिक्षिकांनी तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमासाठी सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत राजेसाहेब खेमसावंत भोंसले, संस्थेच्या चेअरमन राणीसाहेब शुभदादेवी भोंसले, संस्थेचे संचालक दिलीप देसाई, सहसंचालक ॲड. शामराव सावंत, संस्थेचे सदस्य जयप्रकाश सावंत व डॉ. सतीश सावंत तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीम. अनुजा साळगांवकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक-शिक्षक संघ कार्यकारी समितीच्या सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.

# देवधर कालव्याचे निकृष्ट काम खपवून घेणार नाही : सिद्धेश रावराणे

- **पाटबंधारे अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना**

**कोकणसाद वृत्तसेवा**

**वैभववाडी :** देवधर मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतर्गत आर्चिणे आणि गडमठ येथे सुरू असलेल्या कालव्याच्या कामाच्या दर्जावरून पंचायत समितीच्या मासिक सभेत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. कालव्याचे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीने सुरू असून, चुकीचे काम करणाऱ्यांना त्याच पद्धतीने उत्तर दिले जाईल, असा इशारा पंचायत समितीचे सभापती सिद्धेश रावराणे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला.

पंचायत समितीची मासिक सभा सभापती सिद्धेश रावराणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपसभापती साची कोलते, गटविकास अधिकारी प्रिमेश वाघ, सहाय्यक गटविकास अधिकारी स्नेहा माने, पंचायत समिती सदस्य सुवर्णा संसारे, मंगेश लोके, साधना नकाशे, देवानंद पालांडे आदी उपस्थित होते. देवधर प्रकल्पाच्या कालव्याचे आर्चिणे आणि गडमठ येथे काम सुरू आहे. पाईपलाईनच्या माध्यमातून हे काम करण्यात येत असून, कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचा मुद्दा सभेत उपस्थित करण्यात आला. याबाबत पाटबंधारे विभागाला यापूर्वीच कल्पना देण्यात आली होती. मात्र, संबंधितांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे सभापती रावराणे यांनी सांगितले.सध्या टाकण्यात येत असलेल्या पाईपलाईनमधून भविष्यात पाणी प्रवाहित होण्याची शक्यता नसल्याने या कामाचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही. परिणामी शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळणार नाही आणि सिंचन क्षेत्र वाढविण्याचा प्रकल्पाचा उद्देशही साध्य होणार नाही, अशी भूमिका रावराणे यांनी मांडली. पाटबंधारे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी, अशी सूचनाही त्यांनी केली.

बचत गटांच्या निधीची तपासणी करा

उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात आहे. मात्र, हा निधी प्रत्यक्ष बचत गट किंवा ग्रामसंघापर्यंत पोहोचतो का आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर केला जातो का, याची तपासणी करणे आवश्यक असल्याचे सदस्य देवानंद पालांडे यांनी सांगितले. अनेक महिलांपर्यंत योजनांची माहिती व लाभ पोहोचत नसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावर गटविकास अधिकारी प्रिमेश वाघ यांनी संबंधित बचत गटांचे अंतर्गत परीक्षण करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

**२२ सौर संच बंद**

तालुक्यातील अंगणवाड्यांना पुरविण्यात आलेल्या ३७ सौर संचांपैकी तब्बल २२ संच बंद असल्याची माहिती सभेत समोर आली. यापुढे कोणत्याही योजनेअंतर्गत नादुरुस्त वस्तू स्वीकारू नयेत, अशी मागणी सदस्य देवानंद पालांडे यांनी केली.

**वीज पुरवठा खंडित करू नये**

गणेशमूर्ती तयार करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असल्याने महावितरणने सोमवारीही वीजपुरवठा खंडित करू नये, अशी सूचना सभापती रावराणे यांनी केली. तसेच पटसंख्येअभावी बंद असलेल्या काही शाळांच्या इमारती सहकारी विकास सोसायट्यांना देण्याची मागणी संबंधित गावांनी केली आहे. याबाबत शिक्षण विभागाने सकारात्मक विचार करावा, असेही त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या उद्योजकतेला मिळणार नवी दिशा

- **अक्षता मोंडकर : कर्ले महाविद्यालयात बिझनेस क्लबची स्थापना**

**कोकणसाद वृत्तसेवा**




**शिरगांव येथिल कर्ले महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत बिझनेस क्लबची स्थापना करण्यात आली.**

**देवगड :** नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक घडविणे या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून स्थापन झालेला बिझनेस क्लब हा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना व्यवसायाच्या संधींमध्ये रूपांतरित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच उद्योजकतेचा अनुभव, व्यवसायाची दृष्टी, नेतृत्वगुण आणि आत्मनिर्भरतेची दिशा मिळणार आहे असे मार्गदर्शन करीअर कट्टाच्या देवगड तालुका समन्वयक प्रा.अक्षता मोंडकर यांनी शिरगांव येथिल कर्ले महाविद्यालयात केले

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करून त्यांना व्यवसाय, स्वयंरोजगार आणि नवउद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शिरगांव येथिल पुंडलिक अंबाजी कर्ले महाविद्यालयात बिझनेस क्लबची स्थापना करण्यात आली. यावेळी प्रा. अक्षता मोंडकर म्हणाल्या, बिझनेस क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्टार्टअप, स्वयंरोजगार, डिजिटल व्यवसाय, ई-कॉमर्स, स्थानिक व्यवसाय, व्यवसाय व्यवस्थापन आणि आर्थिक नियोजन यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन मिळणार आहे.

तसेच उद्योजकांशी संवाद, व्यवसायविषयक व्याख्याने, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय कल्पना सादरीकरण, बिझनेस प्लॅन स्पर्धा आणि विविध कौशल्यविकास उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य समीर तारी म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींचा शोध घेण्याऐवजी स्वतःच्या व्यवसायाच्या संधी निर्माण करून इतरांसाठीही रोजगारनिर्मिती करणे आवश्यक आहे. हीच गरज लक्षात घेऊन बिझनेस क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे व्यावहारिक शिक्षण देण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या व्यवसाय कल्पनांना प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि व्यासपीठ उपलब्ध होणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची संस्कृती विकसित करण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी बिझनेस क्लबच्या अध्यक्षपदी विराज लाड यांची तर कार्यकारिणीमध्ये सिद्धी सावळे,कशीश घाडी, मानसी भोगले, दीक्षिता खाड्ये यांची निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य समीर तारी, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व पाध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सावंतवाडीत 'भू प्रणाम केंद्रा'चे पालकमंत्र्यांकडून उद्घाटन

**कोकणसाद वृत्तसेवा**



**सावंतवाडी :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने सावंतवाडी येथील उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयात 'भू प्रणाम केंद्रा'चे उद्घाटन राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते संपन्न झाले. 'भूमीचा सन्मान, देशाचा अभिमान' हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आलेल्या या केंद्रामुळे तालुक्यातील नागरिकांना भूमि अभिलेख व महसूल विभागाशी संबंधित सेवा अधिक गतीने आणि पारदर्शकपणे मिळण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी आमदार दीपक केसरकर, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, सावंतवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. श्रद्धाराजे भोंसले, उपनगराध्यक्ष ॲड. अनिल निरवडेकर, भूमि अभिलेख विभागाचे प्रभारी जिल्हा अधीक्षक अनुप जावळे, सावंतवाडीचे उपविभागीय अधिकारी विरसिंग वसावे, भूमि अभिलेखचे उपअधिक्षक विनायक ठाकरे, पंचायत समितीचे उपसभापती गौरव मुळीक, जिल्हा परिषद सदस्य संदीप गावडे, नगरपरिषद सभापती सुधीर आडिवरेकर, आनंद नेवगी, प्रतिक बांदेकर, सौ. मोहिनी मडगांवकर, दीपाली भालेकर, नगरसेवक ॲड . सिद्धार्थ भांबुरे, नगरसेविका सुकन्या टोपले, सुनिता पेडणेकर, एन. बी. रेडकर, ॲड. तेजस परब, माजी नगरसेवक उदय नाईक आदी उपस्थित होते.

सावंतवाडी तहसीलदार कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाच्या आवारात सायंकाळी ७ वाजता हा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या 'भू प्रणाम केंद्रा ' मुळे तालुक्यातील नागरिकांना भूमि अभिलेख व महसूल विभागाशी संबंधित सेवा अधिक गतीने आणि पारदर्शकपणे मिळण्यास मदत होणार असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## जिल्हा परिषद उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार जिल्ह्यातील आठ शिक्षकांना

समितीने छाननी व मूल्यांकन केल्यानंतर प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड करून प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मान्यतेसाठी पाठविला होता. विभागीय आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर आता या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

पुरस्कारप्राप्त शिक्षकांमध्ये कणकवली तालुक्यातून सुशांत सुभाष भमजी, सावंतवाडी तालुक्यातून निता नितीन सावंत, दोडामार्ग तालुक्यातून रामा भिवा गवस, वेंगुर्ला तालुक्यातून प्राजक्ता प्रशांत आपटे, कुडाळ तालुक्यातून अस्मिता अविनाश कुडाळकर, देवगड तालुक्यातून उत्तम नामदेव महिते, वैभववाडी तालुक्यातून दत्तात्रय शांताराम माईणकर, मालवण तालुक्यातून उन्नती बाळकृष्ण कराळे यांची निवड करण्यात आली आहे.

**SBI स्टेट बँक ऑफ इंडिया**
अधिकृत अधिकाऱ्याचा तपशील: - मोबाईल क्र. ९८९२८३४४६०
लँडलाईन क्र. (कार्यालय) ०२२-४१६११४२३ | कंपनीचा मोबाईल क्र. ९८६७९७७६५४

शाखा - स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट शाखा-II, रहेजा चेंबर्स, तळमजला, विंग-बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई ४०००२१
दूरध्वनी क्र. ०२२-४१६११४२३, ई-मेल आयडी: team4.15859@sbi.co.in

**परिशिष्ट - IV-A [नियम ८(६) मधील परंतुक पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबतची सूचना**

**'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' (SARFAESI कायदा) आणि त्यासोबत 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' मधील नियम ८(६) चे परंतुक यांच्या अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना.**
सर्वसाधारण जनतेला आणि विशेषतः कर्जदार व जामीनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, **'स्टेट बँक ऑफ इंडिया'** (तारणधारक धनको) कडे तारण/भारित (charged) असलेल्या आणि बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा **'प्रत्यक्ष ताबा'** (physical possession) घेतला आहे, अशा खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री ०६.१०.२०२६ रोजी **"जशी आहे, जिथे आहे" , "जशी आहे, तशी आहे" आणि "जे काही आहे"** या तत्त्वांवर केली जाईल. बँकेची देणी वसूल करण्यासाठी (SARFAESI कायदा, २००२ अंतर्गत) या भारित मालमत्तेचा/मालमत्तांचा ई-लिलाव खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार आयोजित केला जाईल.

| कर्जदाराचे/कर्जदारांची नावे | जामीनदारांची नावे | ज्या मालमत्तेची/मालमत्तांची विक्री करून वसुली केली जाणार आहे, त्यासंबंधीची थकीत देणी |
|---|---|---|
| वॅरॉन इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड<br>१) ३, श्यामळ अपार्टमेंट, औंध पार्क, पुणे-४११००७<br>२) बी-३३/१ एमआयडीसी, मिरजोळे, रत्नागिरी-४१५६३६ | १) कै. श्री. श्रीकांत सावईकर आणि त्यांचे सर्व कायदेशीर वारस<br>२) श्री. प्रमोद एम. पापणी<br>३) द सांगली फोर्जिंग अँड मेटल इंडस्ट्रीज प्रा. लि. | **रु. ४१०,३२,७९,१०५.१५ (रुपये चारशे दहा कोटी बत्तीस लाख एकोणऐंशी हजार एकशे पाच आणि पंधरा पैसे मात्र)** - दिनांक ३१.१२.२०१८ रोजीची रक्कम, तसेच पुढील व्याज व खर्च.<br>**मागणी नोटीस दिनांक :-** १०.०१.२०१९ |

| मालकी हक्क धारकांची नावे | मालमत्तेचे/मालमत्तांचे वर्णन | ई-लिलावाची दिनांक व वेळ: | राखीव किंमत आणि EMD तपशील: | मालमत्ता पाहणीची दिनांक व वेळ: |
|---|---|---|---|---|
| १. श्री.श्रीकांत सावईकर | १. फ्लॅट क्र. ३, श्यामळ अपार्टमेंट, सर्व्हे क्र. २९, १३०/१, १३०/२, अंतिम भूखंड (Final Plot) क्र. ९३-ए, आनंद पार्क, औंध, तालुका व जिल्हा पुणे, महाराष्ट्र - ४११ ००७. (क्षेत्रफळ ७५ चौ. मीटर). - अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार कोणतीही ज्ञात बोजा/कायदेशीर अडचण नाही. | दिनांक :- ०६.१०.२०२६<br>वेळ :- सकाळी ११:०० वाजल्या-पासून ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत (प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह). | **राखीव किंमत**<br>१. रु. ७६,००,०००/-<br>२. रु. ३,२५,००,०००/-<br>३. रु. ७,४४,००,०००/-<br>यापेक्षा कमी किमतीला मालमत्ता विकली जाणार नाही | ०१.१०.२०२६ सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| २. श्री.श्रीकांत सावईकर | २. युनिट क्र. ३०२, चौथा मजला, **करण तेज बोनिटा** नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, सीटीएस क्र. : ११८७/१६, अंतिम प्लॉट क्र. ५४९/१५, घोले रोड जवळ, शिवाजीनगर, हवेली, तालुका व जिल्हा पुणे, महाराष्ट्र. (प्रशासकीय क्षेत्र १८१.२२ चौ. मी.) (ज्ञात बोजा : (१) रु. ५,७८,६१६/- (सोसायटी देखभाल शुल्क - डिसेंबर २०२५ पर्यंत) (२) रु. १३४५७१७/- (नगरपालिका शुल्क) | | **अनामत रक्कम (EMD)**<br>राखीव किंमतीच्या १०% म्हणजेच<br>१. रु. ७,६०,०००/-<br>२. रु. ३२,५०,०००/-<br>३. रु. ७४,४०,०००/- | |
| ३.मेसर्स व्हारॉन इंडस्ट्रीज प्रा. लि. | ३. भूखंड क्र. B-33, क्षेत्राचे नाव : MIDC मिर्जोळे, गाव/नगर/शहर : मिर्जोळे, जिल्हा : रत्नागिरी, राज्य : महाराष्ट्र - ४१५ ६३९. (कारखान्याची जमीन व इमारत आणि यंत्रसामग्री) - अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार कोणतीही ज्ञात बोजा (encumbrance) नाही. | | **बोलीतील वाढीची रक्कम**<br>१. रु. १,००,०००/-<br>२. रु. २,००,०००/-<br>३. रु. २,००,०००/- | |

***सूचना: कृपया नोंद घ्यावी की, हा ई-लिलाव "जसे आहे, जिथे आहे आणि ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर आयोजित केला जात आहे.**
इच्छुक बोलीदारांनी/खरेदीदारांनी लिलावाच्या वेळेपूर्वीच आमचे सेवा प्रदाता **'BAANKNET'** च्या ई-लिलाव वेब पोर्टलवर **(https://baanknet.com/eauction-psb/eauction/)** नोंदणी करून आणि ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या 'ग्लोबल ईएमडी वॉलेट'मध्ये (Global EMD Wallet) ईएमडी (EMD) रक्कम जमा करणे आवश्यक आहे. जर 'ग्लोबल ईएमडी वॉलेट'मध्ये ईएमडी रक्कम उपलब्ध नसेल, तर प्रणाली बोली लावण्याची परवानगी देणार नाही. नोंदणी, केवायसी (KYC) कागदपत्रांची पडताळणी आणि वॉलेटमध्ये ईएमडी हस्तांतरित करण्याची प्रक्रिया लिलावापूर्वीच पूर्ण करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदार ई-लिलाव संपण्यापूर्वी 'BAANKNET' कडे 'प्री-बिड ईएमडी' (Pre-Bid EMD) जमा करू शकतात. 'BAANKNET' च्या बँक खात्यात रक्कम प्राप्त झाल्यानंतर आणि ई-लिलाव वेबसाइटवर तशी माहिती अद्ययावत (update) झाल्यानंतरच बोलीदाराच्या खात्यात 'प्री-बिड ईएमडी' जमा केली जाईल. बँकिंग प्रक्रियेनुसार यासाठी काही वेळ लागू शकतो; त्यामुळे, ऐनवेळी उद्भवणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी बोलीदारांनी स्वतःच्या हितासाठी 'प्री-बिड ईएमडी'ची रक्कम लवकरात लवकर जमा करण्याचा सल्ला दिला जातो.
अधिकृत अधिकाऱ्याच्या माहितीनुसार मालमत्तेवर कोणताही बोजा (encumbrance) नाही. तरीही, इच्छुक बोलीदारांनी संबंधित कार्यालये/विभागांकडून मालमत्तेवरील बोज्याबाबत स्वतः चौकशी आणि योग्य ती पडताळणी (due diligence) करून घ्यावी. कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा व्यक्तीकडे देय असलेली सर्व वैधानिक/अवैधानिक देणी, कर, दर, आकारणी, शुल्क इत्यादींची रक्कम भरण्याची संपूर्ण जबाबदारी केवळ यशस्वी बोलीदाराची असेल.
विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया 'सुरक्षित धनको' (Secured Creditor) असलेल्या **'स्टेट बँक ऑफ इंडिया'च्या** खालील वेबसाइट्सवरील लिंक पहा: **www.sbi.co.in आणि https://baanknet.com/eauction-psb/eauction/**

| Bank website www.sbi.co.in | e-auction website- https://baanknet.com/eauction-psb/eauction/ |
|---|---|
| | |

| Property id No | Property Location | Video/Photos of property | USP of Property |
|---|---|---|---|
| 77033332685 | | | |
| 77679525935 | | | |
| 77064594533 | | | |

**SARFAESI कायद्यांतर्गत विक्रीची वैधानिक १५ दिवसांची सूचना**
'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२' च्या नियम ८ (६) मधील तरतुदीनुसार, कर्जदार/जामीनदारांना ०१.०९.२०२६ रोजीची सूचना देण्यात आली आहे.

सही/-
**विमल एच. वच्छा**
सहाय्यक महाव्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी, **स्टेट बँक ऑफ इंडिया**

**दिनांक:** ०१.०९.२०२६
**स्थळ:** मुंबई